राज्याचे युवा धोरण २०१२

युवा वसतीगृहाची स्थापना.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः युकयो-२०१२/प्र.क्र.६६/क्रीयुसे-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,

तारीख: २८ एप्रिल, २०१४.

**वाचा-**

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. युकयो-२०११/प्र.क्र.४३/क्रीयुसे-३, दिनांक १४ जून, २०१२

**प्रस्तावना -**

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतास तरूणांचा देश म्हणून ओळख प्राप्त होते आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या तरुणांची आहे. युवांना जागतिकीकरणाच्या गतिशी संतुलितपणे जोडण्यासाठी, आपल्या देशातील युवांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, भौगोलिक वैविध्यतेचे ज्ञान, उत्पन्नाची साधने, नागरिकांची कर्तव्ये व जबाबदा-या याकडे विशेष लक्ष देणे अत्यावश्यक आहे. श्रमशक्तीचे योग्य व्यवस्थापन केल्यास राज्याच्या विकास प्रक्रियेत युवांचा सहभाग वृध्दिंगत होऊ शकतो. मागील साठ वर्षांच्या कालखंडात युवकांसाठी विविध योजना राबविण्यात आल्या असल्या तरी त्यामध्ये सुसूत्रता व दर्जा वाढ करणे गरजेचे आहे. लोकसंख्येने मोठया असलेल्या घटकाच्या विविध गरजांकडे लक्ष न पुरविल्यास त्यांच्यामध्ये प्रचलित व्यवस्थेविषयी वैफल्य येऊन त्यांच्यातील क्रयशक्तीचा वापर होऊ शकणार नाही. महाराष्ट्र राज्य युवा धोरण-२०१२ मध्ये याबाबत सर्वकष विचार करण्यात आला त्यानुसार युवांना नोकरी, व्यवसाय, शिक्षण, मुलाखती, मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी वेळोवेळी शहरांमध्ये जावे लागते. अशावेळी त्यांना त्यांच्या निवासासाठी हक्काचे असे ठिकाण असणे अत्यावश्यक आहे. युवा धोरणामध्ये जिल्हा युवा केंद्रांची गरज ठळकपणे मांडण्यात आलेली आहे, युवांना विविध उपक्रमामध्ये सहभागी होत असताना निवास ही समस्या न राहता त्यांना युवा वसतिगृहे आधार देणारे ठिकाण असणे आवश्यक आहे. वसतिगृहाची सुविधा उपलब्ध झाल्यास युवा त्यांच्या कार्यावर लक्ष केंद्रीत करुन प्रगतीच्या संधींचा योग्य फायदा घेतील. यासाठी वसतीगृहांची निर्मिती करणे गरजेचे आहे. ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

सदर योजनेस ‘युवा वसतीगृहाची स्थापना’, असे संबोधण्यात यावे.

२. **उद्दिष्ट :-**

राज्यातील युवांना भावी आयुष्याच्या जडणघडणीसाठी परीक्षा, प्रशिक्षण, मुलाखती, शिबीरे, चर्चासत्रे यामध्ये सहभागी होता यावे तसेच युवकांना राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यासाठी आयोजित उपक्रमांमध्ये सहभागी होता यावे यादृष्टिने युवांना हक्कांचे निवासाचे ठिकाण उपलब्ध व्हावे हा उद्देश आहे.

३. **युवा वसतीगृहाचे स्वरुप :-**

- राज्यात प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी रु.४.०० कोटी मर्यादेत सुसज्ज वसतीगृहे निर्माण करण्यात येतील. (कोकण विभाग नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर )
- युवा वसतीगृहांमध्ये १०० युवांची निवास सुविधा करुन युवक- युवती यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येतील.
- युवा वसतिगृहे प्राधान्याने विभागीय क्रीडा संकुलाच्या ठिकाणी जागा उपलब्धतेनुसार विकसित करण्यात येतील.
- या वसतीगृहामध्ये अधुनिक सुविधा ई-लॅयब्ररी,लॅन सुविधा फर्निचर, कॅंटिन, कॉन्फरन्स हॉल, दूरदर्शन संच, लॅन सुविधा, संगणक इ., लायब्ररी यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.
- युवा वसतिगृहाच्या व्यवस्थापनासाठी प्रतिवर्षी रु.१२.०० लक्ष इतके अर्थसहाय्य देण्यात येईल.

४. **कार्यकारी समिती :-**

महसूल विभागाच्या ठिकाणी विभागीय क्रीडा संकुले निर्माण करण्यात येत असून या संकुल परिक्षेत्रात युवा वसतीगृहांची उभारणी करण्यासाठी खालील कार्यकारी समिती गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| आयुक्त /संचालक, क्रीडा व युवक सेवा | कार्याध्यक्ष |
| जिल्हाधिकारी | कार्याध्यक्ष |
| आयुक्त,महानगरपालिका | सहअध्यक्ष |
| पोलीस आयुक्त | सदस्य |
| अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम | सदस्य |
| उपवास्तुशास्त्रज्ञ | सदस्य |
| जिल्हा क्रीडा अधिकारी | सदस्य |
| विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा | सदस्य सचिव |

| | |
|---|---|
| राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी- एक | निमंत्रित सदस्य |
| नेहरु युवा समन्वयक | निमंत्रित सदस्य |

(आवश्यकतेनूसार तज्ज्ञ व्यक्ती आमंत्रित करण्याचा अधिकार समिती अध्यक्षांना राहील.)

**५. कार्यकारी समितीच्या कार्यकक्षा :-**

- युवा वसतिगृहासाठी जागा निश्चित करणे.
- युवा वसतिगृहाचे अंदाजपत्रक आणि आराखडे तयार करणे. त्यांना तात्रिक मान्यता देणे,
- युवा वसतिगृहांमध्ये सुविधा निर्माण करण्यासाठी नियोजन करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पास मान्यता घेणे, प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे नियंत्रण करणे.
- युवा वसतीगृहांचे व्यवस्थापनासाठी आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/ कर्मचा-यांमधून अथवा बाहय एजन्सीव्दारे (आऊटसोर्सिंगव्दारे) कर्मचारी वर्ग नेमणे
- युवा वसतिगृहाची नियमावली तयार करणे.
- युवा वसतिगृहाचे व्यवस्थापन व देखभाल यांचे संनियंत्रण करणे.
- युवा वसतिगृहे स्वयंपूर्ण होण्याबाबत उपाययोजना करणे.

**६. युवा वसतीगृह व्यवस्थापन कर्मचारी :-**

युवा वसतीगृहांचे दैनंदिन व्यवस्थापन सुयोग्य रितीने चालविण्यासाठी खालील प्रमाणे कर्मचारी नेमता येतील. त्यासाठी प्रत्येक पदासाठी अधिकत्तम खाली नमूद केलेले रक्कम अनुज्ञेय असेल. सर्व पदावर सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यांमधून नियुक्ती देता येईल. जर सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचा-यांमधून कर्मचारी उपलब्ध होत नसतील तर या पदावर आऊटसोर्सिंगद्वारे विहित पात्रतेचे कर्मचा-यांची नियुक्ती करता येईल. सदरची आऊटसोर्सिंग एजन्सी नियुक्तीचे अधिकार कार्यकारी समितीस राहतील.

- वॉर्डन - १ प्रतिमाह रु. १५,०००/-
- लेखालिपीक - १ प्रतिमाह रु.१०,०००/-
- भांडारपाल - १ प्रतिमाह रु. ८, ०००/-
- चौकीदार - २ प्रतिमाह रु.६,०००/-
- शिपाई - १ प्रतिमाह रु.६,०००/-

**७. सदर कर्मचा-यांबाबतची पात्रता/मानके पुढीलप्रमाणे राहतील:-**

**i) वॉर्डन –**

**(अ) शैक्षणिक अर्हता**

१) **कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर**

२) संगणकाचे ज्ञान आवश्यक

३) व्यवस्थापकीय कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव

**(ब) सेवानिवृत्त कर्मचा-यांचे बाबतीत पात्रता**

- वसतिगृहासाठी वॉर्डन हा भारतीय सैन्य/ वायु / नौदल किंवा केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले वर्ग ब दर्जाचे अधिकारी किंवा सेवानिवृत्त मुख्याधापक यांची नियुक्ती करता येईल.

**(क) पदाची जबाबदारी**

- युवा वसतिगृहाचे दैनंदिन व्यवस्थापन पाहणे.
- कार्यकारी समितीस युवा वसतिगृहाचे खर्च, जमा शुल्क, उपक्रमांची माहिती, वसतिगृहाशी निगडीत सर्व समस्यांबाबत माहिती, शासन अनुदानाबाबतचे प्रस्ताव, इ. सादर करणे आवश्यक राहील.
- या व्यतिरिक्त कार्यकारी समितीने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे अनिवार्य राहील .

**ii) लेखालिपीक –**

**(अ) शैक्षणिक अर्हता**

- किमान शैक्षणिक अर्हता १२ वी उत्तीर्ण, पदवीधर असल्यास प्राधान्य राहील.
- लेखाविषयक कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव
- शासनाची टंकलेखनाची किमान ४० प्र.मि.श. इंग्रजी व ३० प्र.मि.श. मराठी परीक्षा उत्तीर्ण असावा तसेच एम.एस.सी.आय.टी. संगणक परीक्षा उत्तीर्ण असावा.

**(ब) सेवानिवृत्त कर्मचा-यांचे बाबतीत पात्रता**

- केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले वर्ग क दर्जाचे कर्मचारी ज्यांना लेखाविषयक कामाचा अनुभव आहे, त्यांची नियुक्ती करता येईल.

**(क) पदाची जबाबदारी**

- वसतिगृहाचे शुल्क जमा करणे, खर्चाची नोंद ठेवणे, आरक्षणाच्या नोंदी ठेवणे,अनुदानाचे प्रस्ताव तयार करणे इ. कामे लिपीकाची राहतील.
- या व्यतिरिक्त कार्यकारी समितीने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे अनिवार्य राहील.

**iii) भांडारपाल –**

**(अ) <u>शैक्षणिक अर्हता</u>**

किमान १२ वी उत्तीर्ण, पदवीधरास प्राधान्य राहील.

- शासनाची एम.एस.सी.आय.टी. संगणक परीक्षा उत्तीर्ण असावा.

**(ब) सेवानिवृत्त कर्मचा-यांचे बाबतीत पात्रता**

केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले वर्ग क दर्जाचे कर्मचारी ज्यांना भांडारविषयक कामाचा अनुभव आहे, त्यांची नियुक्ती करता येईल.

**(क) पदाची जबाबदारी**

- वसतिगृहामधील साहित्याची नोंद ठेवणे. भांडाराची संपूर्ण व्यवस्था पाहणे
- या व्यतिरिक्त कार्यकारी समितीने वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे अनिवार्य राहील .

iv) **चौकीदार व शिपाई -**

**(अ) शैक्षणिक अर्हता**

- किमान १० वी (एस.एस.सी.) उत्तीर्ण.

**(ब) सेवानिवृत्त कर्मचा-यांचे बाबतीत पात्रता**

- केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले वर्ग ड दर्जाचे कर्मचारी ज्यांनी चौकीदार/शिपाई पदावर काम केले आहे, त्यांची नियुक्ती करता येईल.

**(क) पदाची जबाबदारी**

- कार्यालयाची स्वच्छता, कामकाजात सहाय्य, कार्यालय उघडणे व बंद करणे इ. कामे. शिपायास करावी लागतील.
- वसतिगृहाच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी चौकीदाराची राहील.

६ **उच्चस्तरीय समिती :-**

राज्यात युवा वसतीगृहे निर्माण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे, अंमलबजावणीचा आढावा घेणे इ. साठी खालीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| मा.मंत्री , क्रीडा व युवक कल्याण | अध्यक्ष |
| मा.राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण | सहअध्यक्ष |
| अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) | सदस्य |
| संबंधित विभागीय आयुक्त | सदस्य |
| आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा | सदस्य |
| संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा | सदस्य |
| उपसंचालक,मुख्यालय क्रीडा व युवक सेवा, पुणे | सदस्य सचिव |

उच्चस्तरीय समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी.

७ **मार्गदर्शक तत्वे :-**

- वसतिगृहामध्ये युवक व युवतींसाठी स्वतंत्र कक्ष असावेत.

- खर्चाचे अंदाजपत्रक तयार करताना १०० युवांसाठी किमान निवास व्यवस्था विचारात घेण्यात यावी. अशी व्यवस्था निर्माण करताना डॉरमेटरीज, वातानुकुलित कक्ष, भोजन / उपहारगृह, अंतर्गत सुविधा, विदयुत, पाणी, कक्षांमधील इंटिरीअर,लॉकर्स, स्वागत कक्ष व सुरक्षा रक्षक केबीन इ बाबींचा विचार करण्यात यावा.
- १०० युवांची बैठक व्यवस्था होईल असे सभागृह असावे, चर्चासत्र, बैठका, स्लाईड शो, परिसंवाद, युवांच्या कलागुणांचे सादरीकरण इ. साठी वापर करता येईल.
- वसतिगृहातील काही कक्ष वातानुकुलित करण्यात यावेत, जेणे करुन राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उपक्रमासाठी येणा-या युवांसाठी निवासाची सोय म्हणून याचा वापर करता येईल.
- वसतिगृहामध्ये १६ ते ३५ वयोगटातील युवांना प्रवेश दिला जाईल तसेच युवा उपक्रमामध्ये कार्यक्रमाच्या निमित्ताने सहभागी होणारे केंद्र व राज्य शासनाचे अधिकारी/कर्मचारी निमंत्रित, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी इ. ना प्रवेश राहील.
- वसतिगृहामध्ये निवासास येणा-या व्यक्तीच्या ओळखी व निवासाबाबतचा पुरावा /फोटोपास, उदा. ड्रायव्हिंग लायसन्स्, पॅनकार्ड, रेशनकार्ड, बॅकपासबुक इ. दयावा लागेल.
- वसतिगृहाच्या निवासासाठी आरक्षण देताना प्रथम प्राधान्याने नोंदणी करणा-या युवांना निवास उपलब्ध करुन देण्यात यावा.
- आरक्षण शुल्क प्रति युवा किमान ¡रू १००/- देणे आवश्यक राहील.
- सदर निवारा तात्पुरता असून परीक्षा, स्पर्धा परीक्षा, प्रशिक्षण, मुलाखती, शिबीरे, चर्चासत्रे व तत्सम यामध्ये सहभागी होणा-या युवासाठी आहे. त्याकरिता निवा-यासाठी येणा-या युवकाकडून ज्या कारणासाठी आरक्षण हवे आहे, त्या कारणाबाबतचा कागदोपत्री पुरावा मागावा. एका व्यक्तीस एकावेळेस सलग सात दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी आरक्षण कक्ष निवासासाठी उपलब्ध करण्यात येऊ नये. नोकरी किंवा व्यवसायासाठी येणारे युवा वारंवार निवासासाठी येण्याची शक्यता लक्षात घेता एकाच व्यक्तीस सातत्याने निवास कक्ष उपलब्ध करुन देण्यात येऊ नये.
- कार्यकारी समितीच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडून वसतिगृहासाठी येणारे अनुदान, निवास शुल्काव्दारे होणारे उत्पन्न, देणगी, खात्यात जमा करण्यात यावे. खात्याचे कार्यान्वयन कार्यकारी समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावे.
- वसतिगृहातून मिळणा-या उत्पन्नातून व्यवस्थापनासाठी येणारा खर्च, देखभाल व दुरुस्ती इ. भागविण्यात यावा.
- कार्यकारी समितीची आढावा बैठक तीन महिन्यातून एकदा अथवा समिती अध्यक्षांच्या निर्देशानुसार घेण्यात यावी.

- कार्यकारी समितीच्या खात्याचे लेखापरिक्षण प्रतिवर्षी खाजगी सनदी लेखापाल यांचेकडून करण्यात यावे.
- वसतिगृहातील भोजन /उपहारगृह तसेच स्वच्छतेबाबत स्पर्धात्मक निविदा प्रसिध्द करुन ठेकेदार निश्चित करावा, जेणेकरुन वसतिगृहाची देखभाल व भोजन यांचा दर्जा नियंत्रित राहील.
- युवा वसतिगृहामध्ये महिलांसाठी ३० टक्के कक्ष राखीव असावेत. मात्र महिलांसाठी वेळप्रसंगी ज्यादा कक्ष प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात यावेत.

या योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीचे अधिकार आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात यावे.

या योजनेसाठी पुढीलप्रमाणे लेखाशिर्षामधून तरतूद करण्यात येईल. २२०४ क्रीडा व युवक कल्याण, १०३ विद्यार्थीतर कल्याण कार्यक्रम, (१०) युवक कल्याण-ग्रामीण भाग (११) युवा धोरणांतर्गत योजना, युवा वसतीगृहाची स्थापना (२२०४ ५५७३).

सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-७४१/व्यय-५, दिनांक २८.१०.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०४२९१८१११५१०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.04.29 18:26:27 +05'30'

**(रा.चं.पाटील)**

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,

३. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई,
४. आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा व परिक्षा ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
७. नियोजन विभाग (का.१४७१ )मंत्रालय,मुंबई
८. वित्त विभाग ( व्यय-५),मंत्रालय,मुंबई
९. सर्व उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा (संचालनालयमार्फत),
१०. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयमार्फत),
११. ग्रंथपाल,विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१२. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१३. मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१४. निवड नस्ती (क्रीयुसे-१,क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)
१५. नेहरु युवा केंद्र, मुंबई.